# पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली

## जनसंपर्क शाखा

P.R.O Office, Gadchiroli
**Phone No. 07132223142 Address: SP Office,Gadchiroli**
**E-mail : Prospoffice.gadchiroli@gmail.com**


# वार्तापत्र

पोलीस अधीक्षक कार्यालय गडचिरोली
दिनांक २७/०७/२०१९

## ‘‘वरिष्ठ माओवादयांवरचा विश्वास उडाल्याने सहा माओवादयांचे आत्मसमर्पण’’

- **पोलीसांच्या नवजीवन योजनेवर दाखविला विश्वास**
- **सहा आत्मसमर्पीत माओवाद्यांवर होते एकुण ३२ लाख ५० हजार रू.चे ईनाम**
- **कंपणी क्रमांक ४ चा डि.व्ही.सी. गोकुल मडावी याचा समावेश**

महाराष्ट्र शासनाने जाहीर केलेली आत्मसमर्पण योजना, वर्षभरात विविध चकमकीत माओवाद्यांचा झालेला खात्मा तसेच हिंसाचाराच्या जीवनाला कंटाळुन वरिष्ठ माओवाद्यांसह अनेक जहाल माओवाद्यांनी अदयापर्यंत आत्मसमर्पण केलेले आहे. तसेच पोलीस दलाने नर्मदा सारख्या वरिष्ठ माओवाद्यांना केलेली अटक त्याच बरोबर आत्मसमर्पित माओवाद्यांचे पोलीस दलाने पुनर्वसन घडवुन आणल्यामुळे माओवादी मोठया संख्येने आत्मसमर्पण करीत आहेत. नुकतेच एकुण ३२ लाख ५० हजार रुपये बक्षीस असलेल्या ०६ जहाल माओवाद्यांनी मा. पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सा. यांच्या समोर आत्मसमर्पण केले आहे. गडचिरोली पोलीसांनी माओवाद्यांच्या विरोधात आतापर्यंत केलेली उत्कृष्ठ कामगिरी तसेच विकासाच्या विविध योजना राबवुन जनतेचा विश्वास संपादन केल्यामुळे माओवादी मोठया प्रमाणात आत्मसमर्पण करीत असुन खालील ०६ जहाल माओवाद्यांनी पोलीसांसमोर आत्मसमर्पण केले आहे.

१ **गोकुल उर्फ संजु सन्नु मडावी** हा ३० वर्ष वयाचा माओवादी माहे नोव्हेंबर २००५ मध्ये पेरमिली दलम मध्ये सदस्य म्हणुन भरती होवुन सन २०१३ ला कंपणी क्रमांक ४ मध्ये पी.पी.सी.एम.,व सन २०१७ मध्ये कंपणी क्रमांक ४ च्या डि.व्हि.सी. पदावर काम केलेले आहे. त्याचेवर १५ चकमकीचे गुन्हे, ०३ खुनाचे गुन्हे, ०६ ब्लास्टींगचे गुन्हे दाखल आहेत.**त्याच्यावर शासनाने ८ लाख ५० हजार रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

२ **रतन उर्फ मुन्ना भिकारी कुंजामी** हा २२ वर्ष वयाचा माओवादी माहे सप्टेंबर २०१४ मध्ये सांड्रा दलम मध्ये सामील होवुन जानेवारी २०१५ पासुन माहे एप्रिल २०१९ पर्यंत प्लाटुन क्र. ११ मध्ये सदस्य म्हणून कार्यरत होता. त्याचा मौजा विजापुर घाट चकमक (२०१७), मौजा आयपेंटा चकमक (२०१८) मध्ये सहभाग होता. त्याचे कार्यक्षेत्र मद्देड एरियात असल्याने छत्तीसगड राज्यात त्याचेवर विविध गुन्हे दाखल आहेत. **शासनाने त्याचेवर ५ लाख रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

३ **<u>सरिता उर्फ मुक्ती मासा कल्लो</u>** ही २० वर्ष वयाची माओवादी माहे नोव्हेंबर २०१३ मध्ये भामरागड दलममध्ये सदस्य पदावर भरती होवुन माहे नोव्हेंबर २०१४ पासुन आजपावेतो कंपनी क्र. ०४ मध्ये सदस्य पदावर कार्यरत होती. तिचेवर मौजा दादापुर येथील रोडचे कामावरील वाहने जाळपोळीच्या गुन्हया सोबतच ०३ चकमकीचे गुन्हे दाखल आहेत. **तिचेवर शासनाने ५ लाख रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

४ **<u>शैला उर्फ राजे मंगळु हेडो</u>** ही २० वर्ष वयाची माओवादी माहे जानेवारी २०१८ मध्ये गट्टा दलममध्ये सदस्य पदावर भरती होवुन माहे फेब्रुवारी २०१८ पासुन आजपावेतो भामरागड दलम मध्ये सदस्य पदावर कार्यरत होती. तिचेवर ०३ चकमकीचे, ०१ खुनाचा, ०३ जाळपोळीचे गुन्हे दाखल आहेत. **तिचेवर शासनाने ४ लाख ५० हजार रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

५ **<u>जरीना उर्फ शांती दानु होयामी</u>** ही २९ वर्ष वयाची माओवादी माहे ऑगस्ट २००४ मध्ये गट्टा दलममध्ये सदस्य पदावर भरती होवुन सन २००७ पासुन आजपावेतो भामरागड दलम मध्ये ए.सी.एम. पदावर कार्यरत होती. तिचेवर ०८ चकमकीच्या गुन्हयासह एकुण १९ गुन्हे दाखल आहेत. **तिचेवर शासनाने ५ लाख रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

६ **<u>मिना धुर्वा</u>** ही २२ वर्ष वयाची माओवादी माहे जानेवारी २०१८ मध्ये गट्टा दलममध्ये सदस्य पदावर भरती होवुन माहे एप्रिल २०१८ पासुन आजपावेतो भामरागड दलम मध्ये कार्यरत होती. सध्या भामरागड दलम मध्ये कार्यरत होती. **तिचेवर शासनाने ४ लाख ५० हजार रूपयाचे बक्षीस जाहीर केले होते.**

आत्मसमर्पीत माओवाद्यांमध्ये ०४ महीला व ०२ पुरूष आहेत. दलम मध्ये काम करतांना दलममध्ये महिलांवर होत असलेल्या अत्याचार तसेच दलम मधील माओवादी हे गावात जावुन अल्पवयीन आदिवासी मुलींना पळवुन नेवुन बळजबरीने त्यांना दलममध्ये भरती करत होते. आदिवासींवर होणारे अनन्वयीत अत्याचार व माओवादी नेहमीच स्वत:च्या फायदया साठी जाणुन बुजुन गडचिरोली जिल्हयातील दुर्गम व अति दुर्गम भागाचा विकास कामात आडकाठी निर्माण करतात. या सर्व बाबींना कंटाळुन नक्षलवादयांच्या तावडीतून स्वत:ची सुटका करून घेत आपण विकासाच्या मुळ प्रवाहात परत जावु कि नाही. याबाबत सांशकता होती. परंतू पोलीस दलाने निर्माण केलेल्या विश्वासामुळे व महाराष्ट्र शासनाच्या आत्मसमर्पित योजनेमुळे आम्ही आज पोलीसांपुढे आत्मसमर्पण करत असल्याचे या आत्मसमर्पितांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी दलममधील इतर माओवादी यांनी देखील हिंसाचाराचा मार्ग सोडून मुळ प्रवाहात परत यावे व आपणच आपल्या आदिवासी बांधवांवर करत असलेले अनन्वीत अत्याचार थांबवुन आपल्या भागाचा देखील इतर उन्नत समाजाप्रमाणे विकास व्हावा. या दृष्टीने विकासाच्या मुळ प्रवाहात येण्यासाठी आत्मसमर्पण योजनेचा फायदा घेत विकासाच्या मुळ प्रवाहात यावे याबद्दल आवाहन केले.

पोलीस विभागाने आत्मसमर्पण करण्याचे आवाहन व शासनाची आत्मसमर्पण योजना आणि पोलीस दलाने भुखंड, आर्थिक मदत, रोजगाराची उपलब्धता, नसबंदी रिओपनींग या सारख्या माध्यमातुन आत्मसमर्पीतांचे पुनर्वसन घडवुन आणल्यान मोठया प्रमाणावर माओवादयांनी आत्मसमर्पण केले आहे.

विकास कामांना रोखणाऱ्या माओवाद्यांवर पोलीस दल सक्षमपणे कारवाई करण्यास तत्पर असुन जे माओवादी विकासाच्या प्रवाहात सामील होण्यास इच्छुक असतील त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी तसेच लोकशाहीतील सन्मानाचे जीवन जगण्यासाठी गडचिरोली पोलीस दल सर्वतोपरी मदत करेल असे आवाहन मा. पोलीस अधीक्षक गडचिरोली श्री शैलेश बलकवडे सो. यांनी केले आहे.


महाराष्ट्र पोलीस
GADCHIROLI POLICE
FORTUNE FAVOURS THE BRAVE
महाराष्ट्र पोलीस